**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक २५ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. **गडचिरोलीच्या आकांक्षित तालुक्यांतील पाच हजार लाभार्थी कुटूंबासाठी' उपजिविका विकास कार्यक्रम' राबविण्यात येणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**
2. **भारतीय खान उद्योगाला भवितव्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रोसेसिंग हे महत्त्वाची प्रक्रिया इंडियन ब्युरो ऑफ माईन्सचे महाव्यवस्थापक पी.एन.शर्मा यांच प्रतिपादन.**
3. **फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच भारताच्याच कोनेरू हंपी आणि दिव्या देशमुख या दोघींमध्ये उद्या होणार अंतिम लढत.**
4. **पुढील २४ तासासाठी गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली या पुर्व विदर्भातील जिल्ह्यांना अतिमुसळधार पावसाचा रेड अलर्ट; चंद्रपूर गडचिरोली येथे शाळा महाविद्यालयांना आज सुट्टी.**

**आकांक्षित तालुके**

गडचिरोली जिल्ह्यातील आकांक्षित तालुक्यांच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नातून 'उपजिविका विकास कार्यक्रम' राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत ४९ गावांचा समावेश असून यात ॲक्सिस बँक फाउंडेशनचा सक्रीय सहभाग असणार आहे. १ जानेवारी २०२५ पासून हा प्रकल्प राबविण्यास सुरुवात करण्यात आली असून या उपक्रमासाठी आगामी तीन वर्षासाठी २० पूर्णांक ३४ कोटी रूपये इतकी तरतूद करण्यात आली आहे. या माध्यमातून पाच हजार लाभार्थी कुटुंबांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल. हवामानाशी सुसंगत शाश्वत शेतीला प्रोत्साहन देऊन, उपजिविकेत सुधारणा करणे, नागरिकांचे जीवनमान उंचावून समुदायाचे कल्याण साधणे हे प्रमुख उद्दिष्टे या प्रकल्पात पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी मुख्य उपक्रमांतर्गत शेती आधारित उपजिविका, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, शेतीतर उपजिविका हस्तक्षेप, सामूहिक उद्योजकता, आरोग्य आणि पोषण या बाबींवर लक्ष देण्यात येईल.२०२७-२८ पर्यंत या प्रकल्पांद्वारे सहभागी कुटुंबांना लाभ होईल. त्यांच्या मूळ उत्पन्नाच्या तुलनेत उत्पन्न दुगुणी होईल. तसच शेती उत्पादकता वाढवून उपजिविकेच्या संधी उपलब्ध होतील.

**परिसंवाद**

भारतीय खान उद्योगाला भवितव्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रोसेसिंग ही महत्त्वाची प्रक्रिया असून प्रत्येक खनिज ब्लॉकला महत्त्व प्राप्त करून देण्यासाठी प्रोसेसिंग महत्वाची ठरते. अस इंडियन ब्युरो ऑफ माईन्सचे महाव्यवस्थापक पी.एन.शर्मा यांनी आज सांगितलं. इंडियन ब्युरो ऑफ माईन्स नागपूरच्या तसच मायनिंग इंजिनिअर असोसिएशन ऑफ इंडिया नागपूर शाखेच्या वतीन आज 'भारतीय खाण उद्योग-वर्तमान दृश्य आणि भवितव्य' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाच आयोजन करण्यात आल होत. त्यावेळी अध्यक्ष स्थानावरून शर्मा बोलत होते. यावेळी त्यांनी विश्वास व्यक्त केला की पुढील दशकामध्ये विदर्भ हा खाण उद्योगातील एक महत्त्वाचा क्षेत्र म्हणून देशात उदयास येईल .'भारतीय खान क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञान मशिनरी यासोबत अद्यावत राहणे आवश्यक असून एक्सप्लोरेशन,प्रोसेसिंग आणि मायनिंग या क्षेत्रामध्ये सुद्धा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर खाण उद्योगाला करणे

आवश्यक असल्याच प्रतिपादन इंडियन ब्युरो ऑफ माईन्सचे मुख्य खाण व्यवस्थापक पंकज कुलश्रेष्ठ यांनी यावेळी मुख्य अतिथी म्हणून केल. या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा उद्देश आधुनिक खान तंत्रज्ञान, सद्य काळातील तांत्रिक प्रगती आणि शाश्वत खाण धोरणे यावर केंद्रित चर्चा घडवून आणणे हा आहे.

**चंद्रकांत पाटील**

अमरावती शहराच्या हृदयस्थानी 167 एकरावर आणि साडेतीनशे विविध वनस्पती असलेल्या शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेला स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा मिळवण्यासाठी सहकार्य करू अस आश्वासन राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी दिले. आज शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेत परीक्षा भवन आणि प्रशासकीय इमारत, वाचनालयाचे उद्घाटन, तसच स्मार्ट क्लासरूमचे भूमिपूजन करण्यात आले. यानिमित्तान आयोजित मुख्य कार्यक्रमात ते बोलत होते.

दरम्यान, चंद्रकांत पाटील यांचे शुभहस्ते संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पाच आणि विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयांमधील पाच असे एकूण दहा मृत झालेल्या कर्मचायांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सहमतीनुसार डिसेंबरपर्यंत अनुकंपा तवावरील सर्व नियुक्त्या पूर्णपणे करण्यात येणार असल्याचे पाटील यांनी यावेळी स्पष्ट केलं.

**विकासकामे आढावा**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगे महाराज यांनी समाजजागृती, स्वच्छता, ग्रामविकास आणि आध्यात्मिक क्षेत्रात केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे. त्याचप्रमाण कौंडण्यपूर देवस्थान येथील रुक्मिणी मातेवर असंख्य भाविकांची श्रद्धा आहे. या तीनही स्थळांच्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेऊन, आठ दिवसांच्या आत त्याचे अंदाजपत्रक तयार करून शासनास सादर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना नमूद केल्यानुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात काल विशेष बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत मोझरी, वलगाव आणि कौंडण्यपूर या तीर्थक्षेत्रांशी संबंधित प्रलंबित विकासकामांचा आढावा घेण्यात आला.

**फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धा**

जॉर्जियाच्या बातुनी येथे ‘फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक’ स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच भारताच्याच कोनेरू हंपी आणि दिव्या देशमुख या दोघींमध्ये उद्या शनिवारी अंतिम लढत होणार आहे. काल झालेल्या उपांत्य फेरीत दिव्या देशमुख हिनं चीनची ग्रँडमास्टर ‘तान झॉंगयी’ हिच्यावर मात केली, तर कोनेरू हंपीनं चीनची ग्रँडमास्टर ‘लेई टिंगजिए’ हिचा पराभव केला. आता या स्पर्धेचं जेतेपद आणि उपविजेतेपद भारताकडे येणार आहे. भारतासाठी हा बुद्धिबळाच्या पटावरचा मोठा मैलाचा दगड ठरणार आहे. महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेच्या उपांत्य फेरीतील चमकदार विजयासह अंतिम फेरीत धडक देणाऱ्या मास्टर दिव्या देशमुख हिला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विजयासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विशेष म्हणजे, नागपूरकर असलेल्या दिव्या देशमुखन गतवर्षी कनिष्ठ गटात महिला विश्वचषकावर नाव कोरले होते. ही घोडदौड कायम ठेवत तिन यंदा वरिष्ठ स्तर स्पर्धेत अव्वल कामगिरी करत आपली छाप उमटवली आहे.

**हवामान**

पुढील २४ तासासाठी गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली या पुर्व विदर्भातील जिल्ह्यांना अतिमुसळधार पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला असल्याच राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आल आहे. वर्धा आणि नागपूरला आज ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. गडचिरोलीत कालपासून मुसळधार पाऊस पडत असल्यान नदी, नाल्यांना पूर आला असून, पर्लकोटा नदीच्या पुलावरुन पाणी वाहू लागल्यान आज सकाळ पासून भामरागड तालुक्यातील ५० हून अधिक गावांचा बाह्य जगताशी संपर्क तुटला असून आलापल्ली-भामरागड मार्ग बंद आहे.तर 50 हून अधिक गावांचा संपर्क तुटला आहे. शिवाय सिरोंचा-असरअली, ताडगाव-दामरंचा आणि अहेरी-वट्रा हे मार्गही बंद आहेत.भंडारा जिल्ह्यातील गोसेखुर्द धरणाचे ३३ पैकी २७ दरवाजे अर्ध्या मीटरने उघडण्यात आले असून, त्यातून ३ हजार २४ क्यूमेक्स पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. दरम्यान रेड अॅलर्ट जारी केल्यान मोर्शी, अहेरी, भामरागड, मुलचेरा, सिरोंचा इत्यादी तालुक्यांतील शाळा, महाविद्यालयांना आज सुटी जाहीर केली आहे. चंद्रपूर जिल्हयातही सर्व शाळा, महाविद्यालये, खाजगी कोचिंग क्लासेस यांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

**क्रिकेट**

इंग्लंडन मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड येथे सुरु असलेल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट ट्रॉफीच्या चौथ्या सामन्याच्या तिसऱ्या दिवशी भारताविरुद्धच्या पहिल्या डावात शेवटचे वृत्त हाती आले तेव्हा इंग्लडन 2 बाद 332 धावा केल्या. झॅक क्रावे आणि बेन डकेट यांनी 166 धावाची भागीदारी केली तर भारताकडून जसप्रीत बुमराह आणि रविंद्र जडेजान प्रत्येकी 1 गडी बाद केले. यजमान इंग्लंडन आज रात्रीच्या 2 बाद 225 धावांवर आपला डाव पुन्हा सुरू केला. काल भारताचा पहिला डाव 358 धावांवर संपला. सध्या, भारतीय संघ पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत 1-2 असा पिछाडीवर आहे.

**ड्रोन प्रशिक्षण**

राष्ट्रीय कॅडेट कॉर्प्सन भारतातील मास्टर ड्रोन, प्रशिक्षक उमेदवारांच्या पहिल्या बॅचचे यशस्वीरित्या पूर्ण करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. हा अभ्यासक्रम नागपूरच्या कामठीमधील ऑफिसर्स ट्रेनिंग अकादमी येथे आयोजित करण्यात आला होता. मास्टर ड्रोन प्रशिक्षक अभ्यासक्रम एनसीसी कॅडेट्सना ड्रोन प्रशिक्षण, उत्पादन, उड्डाण आणि दुरुस्तीमध्ये व्यापक ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी डिझाइन केला आहे.

**मेट्रो कार्ड**

नागपूर मेट्रोन प्रवाशांना सुलभ आणि किफायतशीर प्रवासासाठी नव-नवीन उपाययोजना केल्या आहेत. याचाच एक भाग म्हणून महा मेट्रो नागपूरकडून महा कार्डसाठी लागू असणाऱ्या शुल्कावर १००% सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केवळ रु.200 चा टॉप-अप करून हे महा कार्ड मोफत मिळवू शकता. या उपक्रमाची तत्काळ अंबलबजावणी होत असून 15 सप्टेंबर 2025 पर्यंत लागू असणार आहे. हे कार्ड पदवीपर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. हे महा कार्ड स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या सहकार्यान जारी करण्यात आले असून, सामान्य प्रवाशांसाठी मेट्रो भाड्यावर १०% सवलत आणि विद्यार्थ्यांसाठी ३०% सवलत दिली जाते.

*****